## नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२५ मधील निशाणी ०७ खालील आदेश

## (CNR No. MHRT08-000120-2025)

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने दावा मिळकत विषयक देवघराच्या दरवाजा व कुलुपाला लावलेली सुचना काढुन त्या दरवाजाच्या कुलुपाची चावी पुर्वीप्रमाणे दरवाजाबाहेर खिळ्याला अडकवुन ठेवावी अथवा ते कुलुप काढुन टाकावे व त्या दरवाजाला परत कुलुप लावु नये व दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी हिने वादींना दावा विषयक देवघरात देवाची पुजाअर्चा, श्री गणपती उत्सव, इतर धार्मिक कार्ये, उत्सव करणेस कोणताही हरकत अडथळा स्वतः अथवा इतरांमार्फत करु नये, असा तुर्तातुर्त मनाई हूकूम प्रतिवादीविरुध्द करण्यात यावा, यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, वादी हे गाव मौजे लोवले येथील कायमचे रहिवासी आहेत. प्रतिवादी ही वादींची सख्खी बहीण आहे. ती सध्या तिचे व वादी यांचे सख्खे भाऊ – रामचंद्र यांचेकडे नालासोपारा येथे राहते. लोवले गावात वादी, प्रतिवादी यांचे वडीलांनी १९५३ सालात त्यांचे स्वतःचे कमाईतुन घर बांधले आहे. सदर घराचा ग्रामपंचायत, लोवले घर क्रमांक १५४ असा आहे. प्रतिवादी ही लग्नानंतर तिच्या नवऱ्यासोबत मुंबई येथे राहत होती. परंतु, २००३ सालात ती नवऱ्यासोबत भांडण करुन माहेरी निघुन आली. त्यावेळी वर उल्लेखीत मुळ घर क्रमांक १५४ मध्ये एका भागात वादी क्रमांक ०१ व त्याचे कुटूंब, त्याचे आई–वडील राहत होते. दुसऱ्या भागात रामचंद्र हा त्याचे कुटूंबासह राहत होता. तसेच घराच्या मधल्या खोलीत वडीलांपासुन स्थापीत असलेल्या वादी व प्रतिवादी कुटुंबाचे मुळ देव होते. त्यामुळे ती खोली देवघर म्हणुन ओळखली जाते. सदरची देवघराची खोली म्हणजे लोवले, ग्रामपंचायत घर क्रमांक १५४ व तसेच प्रतिवादीने लावलेले कुलुप हा

दाव्याचा विषय (दावा मिळकत) आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे, सन २००३ सालात प्रतिवादी नवऱ्यासोबत भांडण करुन माहेरी निघुन आल्यावर वादी क्रमांक ०१ कडे राहु लागली. त्यानंतर ती वादी क्रमांक ०१ च्या पत्नीसोबत भांडण करु लागली. त्यामुळे, सन २००५ च्या सुमारास वादी, त्याचे आई–वडील यांनी प्रतिवादी हिला त्याच घरात वेगळे राहायला सांगितले व देवघरात राहायला तिला जागा दिली. प्रतिवादी हिला मुलबाळ नाही. सन २०११ साली वादी व प्रतिवादी याचे आई–वडील वारले. ते वारल्यानंतर त्यांचे दागदागिने घेवुन वादी, रामचंद्र, दुसरी बहिण–शांती यांनी मिळुन प्रतिवादी हिला रक्कम रुपये ६०,०००/– दिले.

**०३.** वादीचे म्हणणे थोडक्यात पुढे असे आहे की, सन २०१४ पासुन प्रतिवादी भाऊ – रामचंद्र याच्याकडे नालासोपारा येथे राहते. त्यानंतर सन २०२२ साली गावचे पोलीस पाटील (फौजदार) रवि नारायण पवार यांच्यासमोर वादी, प्रतिवादी, रामचंद्र, शांती यांची वडीलोपार्जीत जागा व घराचे वाटप करण्यात आले व त्याबाबतचा एक लेख तयार करण्यात आला. त्यावर वादी, प्रतिवादी, रामचंद्र, रवि पवार यांच्या सहया आहेत. दुसरी बहिण–शांती हिने वडीलोपार्जीत जागा व घर यामधील हक्क तोंडी सोडुन दिला आहे. सदर वाटपाच्या वेळी दावाविषयक घर क्रमांक १५४ चे तीन रुममध्ये विभागलेले होते, त्यातील डावीकडची रुम रामचंद्र याला देण्यात आली. मधली रुम (दावा घर) प्रतिवादी हिला देण्यात आली व त्याच्या बाजुची रुम रामचंद्र वादी क्रमांक ०१ याला देण्यात आली. त्यामुळे प्रतिवादी हिला देण्यात आलेली रुम देवघर म्हणुन मान्य करण्यात आले व त्याठिकाणी वादी, रामचंद्र, शांती यांनी देवपुजेसाठी श्री गणपती उत्सवासाठी व अन्य कोणत्याही धार्मिक कार्यक्रमासाठी जाणे–येणेचे मान्य करण्यात आले आहे. सदर देवघरात पुर्वापारपासुन दरवर्षी श्री गणपती आणला जातो व त्याठिकाणी श्री गणपती उत्सव वादी साजरा करतात.

**०४.** वादीचे म्हणणे थोडक्यात पुढे असे आहे की, सदर देवघरातील मुळ देवाची पुजाआर्चा वादी आजतगायत नियमितपणे करत आला आहे. वादी क्रमांक – ०१ हे सध्या वास्तव्यास मुंबई येथे आहेत. वादी क्रमांक – ०२ यांनी गावात घर बांधले असल्याने ते गावी येवुन–जावुन असतात. वादी क्रमांक – ०१ हे मुंबईहुन गावी वास्तव्यास येतात तेव्हा नित्यनियमाने देवाची पुजाअर्चा करतात. प्रतिवादी ही जरी नालासोपारा येथे राहत असली तरी त्यांच्या वाटयाला आलेल्या देवघराच्या कुलुपाची चावी कुलुप लावल्यावर दरवाजाबाहेर खिळयाला अडकवुन ठेवत असत. दिनांक १६/०१/२०२५ रोजी वादी ज्यावेळी गावी आले त्यावेळी त्यांना देवघराच्या रुमच्या दरवाजाला कुलुप व सुचना लावलेली दिसली. सदर सुचनेमध्ये *''सदर मिळकत खोली माझे नावे आहे. सदर मिळकत खोली बंद असते. कारण की, कामानिमित्त मी मुंबई येथे राहते. तरी, सदर खोली माझ्या परवानगीशिवाय कोणीही कुलुप अथवा दार तोडुन आत गेल्यास त्याच्यावर मी भारतीय न्याय दंड संहितेनुसार योग्य गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी ''*, असे लिहिले होते व त्या सुचनेवर नाव टाकुन प्रतिवादी हिने सहया केल्याचे वादीस निदर्शनास आले. त्यामुळे, वादी यांनी आजुबाजुला पाहिले असता, त्या कुलुपाची चावी प्रतिवादीने ठेवली नसल्याचे निदर्शनास आले. सदरची सुचना पाहुन वादी यांना धक्का बसला. त्यानंतर वादी यांनी प्रतिवादी यांना त्याबाबत विचारणा केली असता, तिने सदरचे कुलुप उघडण्याचे व वादी यांना देवघरात प्रवेश करण्यास नकार दिला.

**०५.** वादीचे म्हणणे थोडक्यात पुढे असे आहे की, त्यानंतर वादी यांच्या असे निदर्शनास आले की, भाऊ – रामचंद्र यांच्या चिथावणीनुसार प्रतिवादी हिने सदरची सुचना लिहिली आहे. कारण, प्रतिवादी ही त्याचेकडे राहत असल्याने व तिला मुलबाळ नसल्याने रामचंद्र याला प्रतिवादीची रुम मिळवावयाची आहे. रामचंद्र याचे गेली ०५ वर्षे वादीशी बोली भाषा नाही. प्रतिवादी यांनी वर उल्लेखीत सुचना

लावल्यामुळे देवघरात प्रवेश करण्यानुसार प्रतिबंधीत केले आहे. सदरचे देवघर हे व त्यामधील देव हे वाडवडीलार्जीत आहेत. सदर देवघरात प्रवेश करणे, देवपुजा करणे, गणपती उत्सव साजरा करणे, अन्य धार्मिक कार्ये उत्सव साजरा करणे हे वादीचे कायदेशीर अधिकार आहेत. त्या अधिकारानुसार वादींना प्रतिवादीने प्रतिबंधीत केले आहे. त्याचप्रमाणे, त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. सदर देवघरात असलेल्या देवांवर वादींची श्रद्धा आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग झाले आहे. यापुर्वी वादीने प्रतिवादीला लेखी नोटीस देखील पाठविली आहे. त्या नोटीसला प्रतिवादीने खोटे व खोडसाळ उत्तर देखील दिले आहे.

**०६**. वादीचे म्हणणे थोडक्यात पुढे असे आहे की, सदरहु दाव्याचा गुणदोषांवर निकाल होण्यास बरीच वर्षे लागणार आहेत. परंतु, त्यामुळे दरम्यानच्या काळात वादी त्यांच्या दावा विषयक देवघर, देवाची पुजाअर्चा, श्री गणपती उत्सव व अन्य धार्मिक कार्ये करण्याच्या न्याय हक्कापासुन वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकदीचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे. वादी यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस व न्यायाचा तौलानिक तराजू असून सदरचा अर्ज मंजुर न झाल्यास पैशांच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरीमित असे नुकसान होईल. याउलट प्रतिवादीचे काहीच नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्यास विनंती केली आहे.

**०७**. प्रतिवादीने निशाणी क्रमांक ०७ वर म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे की, कै. गणपत रामा (कान्हा) बाईत हे दिनांक २६/०९/२०११ रोजी मयत झाले असुन त्यांच्या मृत्यूपश्चात – श्री. तुकाराम गणपत बाईत, श्री. रामचंद्र गणपत बाईत, श्री. मोहन गणपत बाईत, श्रीमती वासंती जानु दोरकडे, श्रीमती वंदना गणपत बाईत, असे एकुण पाच कायदेशीर वारस आहेत.

कै. गणपत रामा (कान्हा) बाईत यांनी त्यांच्या कमाईतुन गाव मौजे लोवले (फटकरेवाडी) येथे घर बांधले. सदरील घरास ग्रामपंचायत लोवले येथे घरपट्टी क्रमांक १५४ असा आहे. कै. गणपत रामा (कान्हा) बाईत यांच्या निधनानंतर सदरील घराचे तीन हिश्श्यामध्ये वाटप झाले त्यामध्ये वादी क्र. ०१ श्री. तुकाराम गणपत बाईत यांचा एक हिस्सा, प्रतिवादी श्रीमती वंदना गणपत बाईत यांचा हिस्सा व श्री. रामचंद्र गणपत बाईत यांचा हिस्सा आहे. त्यानुसार, ग्रामपंचायत लोवले येथे सदरील घरास घरपट्टी क्रमांक १५४(i) वादी यांची, घरपट्टी क्रमांक १५४(ii) श्री. रामचंद्र गणपत बाईत यांची, घरपट्टी क्रमांक १५४ (iii) प्रतिवादी यांची अशाप्रमाणे घरपट्टी लावलेली आहेत. तसेच वादी क्रमांक ०२ यांचे दुसरे घर आहे. सदरील वाटप हे आपसमजुतीने झालेले वाटप होते. देवघर असल्याकारणाने वादी व श्री. रामचंद्र गणपत बाईत हे त्यावेळी आपल्या हिश्यात घेत नसल्याकारणाने सदरील देवघराची रुम ही या प्रतिवादीच्या हिश्श्यास आलेली आहे.

०८. प्रतिवादीने निशाणी क्रमांक ०७ वर पुढे असे म्हणणे दाखल केले की, प्रतिवादी हया आई–वडीलांकडे राहत असल्याने वादी क्र. ०१ व त्याच्या पत्नीस बघवत नव्हते व ते दोघे वारंवार तिला नाहक त्रास देणे, अपमान करणे सततचे टोमणे मारणे व प्रतिवादीस कशाप्रकारे त्रास देता येईल, हे आजतागायत करीत आहेत, जेणेकरुन तिच्या हिश्श्याची रुम ही त्यांना मिळावी यासाठी काहीना–काही प्रयत्न करीत आहेत. देवघर असल्याकारणाने वादी व श्री रामचंद्र गणपत बाईत हे त्यावेळी आपल्या हिश्श्यात घेत नसल्याकारणाने सदरील देवघराची रुम ही या प्रतिवादीच्या हिश्श्यास आलेली आहे. त्यामध्ये धार्मिक कार्य होत असे ते सर्व मिळुन पार पाडीत असत. परंतु, काही वर्षे झाली, वादी हे धार्मिक कार्याच्या नावे प्रतिवादी हे विनाकारण त्रास देत आहेत. तसेच तिला मारहान करत आहेत. तसेच प्रतिवादीच्या रुममध्ये शिरुन तिचे सामान फेकाफेक करीत असतात व फार नुकसान करीत असतात.

याबाबत प्रतिवादी वादी क्र. ०१ व त्यांच्या पत्नी विरुध्द पोलीस ठाणे संगमेश्वर येथे दिनांक १८/०३/२०२४ रोजी मारहान केल्याबाबत फिर्याद दिली होती. तसेच दिनांक १८/०९/२०२३ रोजी मा. तंटामुक्ती समिती अध्यक्ष तुटामुक्तीमध्ये लेखी स्वरुपात तक्रार दिली होती. तसेच दिनांक १८/०३/२०२४ रोजी देवघरातील देव आपल्या रुममध्ये ठेवण्यास नोटीस पाठविली. वादीस या प्रतिवादीचे घर बळकावयाचे आहे, या कारणाने ते वारंवार त्रास देत असतात.

**०९.** प्रतिवादीने निशाणी क्रमांक ०७ वर पुढे असे म्हणणे दाखल केले की, सध्याच्या काळात जमीनीच्या किंमती भरमसाठ वाढ झाल्याने केवळ आर्थिक हव्यासापोटी या प्रतिवादीच्या रुम फुकटच लाटण्याच्या हेतुने वादीने दावा मिळकतीशी काही एक संबंध नसताना सदरचा खोटा व खोडसाळ दावा दाखल केलेला असुन तो या प्रवितादीस मान्य व कबुल नाही. त्यामुळे वादीचा निशाणी क्रमांक ०७ कडील तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्यास पात्र आहे, अशी विनंती या प्रतिवादीने केली आहे.

**१०.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिले.

**११.** अभिलेखावरुन व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला असता, खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी यानंतर नमूद कारणांमुळे निष्कर्ष नोंदविले आहेत –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृतदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे का? | ...होय. |
| २. | न्यायाचा तौलानिक तराजु वादींच्या बाजुने आहे, असे वादींनी शाबीत केले आहे का? | ... अंशत: होय. |

| | | |
|---|---|---|
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल, असे वादींनी शाबीत केले आहे का ? | ... अंशत: होय. |
| ४. | काय आदेश ? | ...अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ करीता :–**

**१२.** सदरील मुददे एकमेकांशी संलग्न असल्याने, पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. तुर्तातुर्त मनाईचा अर्ज निकाली काढताना वादीस सकृतदर्शनी केस आहे का, न्यायाचा तौलानिक तराजु कोणाच्या बाजुने आहे व अर्ज मंजुर केल्यास कोणत्या पक्षकाराचे जास्त नुकसान होईल, हे पाहणे गरजेचे असते. प्रस्तुत प्रकरणात उभयपक्षकारांतर्फे दाखल केलेली कागदपत्रे पाहणे आवश्यक आहेत.

**१३.** वादींनी निशाणी ०६ कडील कागदयादी सोबत खालील कागदपत्रे दाखल केली आहेत –

| *अनु. क्र.* | *कागदांचा तपशील* | *दिनांक* |
|---|---|---|
| १ | वादी व प्रतिवादी यांचे दरम्याने झालेल्या वडीलोपार्जीत जागा व घर वाटपाचा लेख | १२/१२/२०२२ |
| २ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (iii) चा कर आकारणी | २०२४–२०२५ |

| | | |
|---|---|---|
| | उतारा | |
| ३ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (i) चा कर आकारणी उतारा | २०२४–२०२५ |
| ४ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (ii) चा कर आकारणी उतारा | २०२४–२०२५ |
| ५ | प्रतिवादीने ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (iii) च्या दरवाजावर लावलेली सुचनाची प्रत | – |

**१४.** तसेच प्रतिवादीने निशाणी २१ कडील कागदयादी सोबत खालील कागदपत्रे दाखल केली आहेत –

| *अनु. क्र.* | *कागदांचा तपशील* | *दिनांक* |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (i) ची घरपट्टीची छायांकित प्रत | २०२४–२०२५ |
| २ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (ii) ची घरपट्टीची छायांकित प्रत | २०२४–२०२५ |
| ३ | ग्रामपंचायत लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील घर क्रमांक १५४ (iii) ची घरपट्टीची छायांकित प्रत | २०२४–२०२५ |

| | | |
|---|---|---|
| ४ | दिनांक २७/०१/२०२५ रोजी वादीने प्रतिवादी यांना पाठविलेली नोटीसीची छायांकित प्रत | २७/०१/२०२५ |
| ५ | दिनांक १८/०९/२०२३ रोजी मा. तंटामुक्ती अध्यक्ष, तुटामुक्तीसमितीमध्ये लेखी स्वरुपात तक्रार नोंदीची छायांकित प्रत | १८/०९/२०२३ |
| ६ | दिनांक १८/०३/२०२४ रोजी वादीने पोलीस ठाणे संगमेश्वर येथे मारहानीबाबत केलेली फिर्यादची छायांकित प्रत | १८/०३/२०२४ |
| ७ | दिनांक १८/०३/२०२४ रोजी प्रतिवादीने वादीस पाठविलेली नोटीसची छायांकित प्रत | १८/०३/२०२४ |
| ८ | दिनांक ०७/०८/२०२५ रोजीचे कुलमुखत्यारपत्रची छायांकित प्रत | ०७/०८/२०२५ |
| ९ | हात नकाशा | – |
| १० | दावा मिळकतीचे छायाचित्रे | – |

**१५.** अभिलेखावरून घरपट्टी क्रमांक १५४ (iii) मध्ये मुळ देवघर असून देवघराच्या रुमच्या दरवाजाला कुलुप व सुचना लावलेली असल्याचे प्रतिवादीने नाकारलेले नाही. वादींतर्फे दाखल वडीलोपार्जीत जागा वाटपाची कागदामध्ये *''जुने घर मोडुन नवीन दार बांधण्याचे नियम नमुद केले असुन त्यामध्ये वादी क्र. ०१ यांनी व रामचंद्र बाईत यांनी घर नवीन बांधताना प्रतिवादीच्या मधल्या रुमपासुन दोन–दोन फुट जागा सोडुन घर बांधावयाचे आहे व प्रतिवादीचे रुम देवघर म्हणुन मान्य केले असुन प्रतिवादी त्या रुममध्ये राहु शकते व तिला कोणी त्रास करणार नाही असे मान्य*

*केल्याचे* '' त्यात नमुद केले आहे. सदर कागदपत्रांवर वादी व प्रतिवादी – रामचंद्र गणपत बाईत यांची सही आहे. प्रतिवादीने त्यांच्या कैफियतमध्ये घरपट्टी पावती क्रमांक – १५४ चे तीन भाग झाले आहेत ते वाटप आपसमजुतीने झाले होते व वादी व रामचंद्र बाईत हे देवघर त्यांच्या हिश्यात येत नसल्याने ती रुम प्रतिवादीच्या हिश्यात असल्याचे नमुद केले आहे. वादीने दाखल केलेल्या दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या वडीलोपार्जीत कागद यावर वादीने कोणताही मजकुर लिहिला नसताना प्रतिवादीच्या सहया घेतल्या होत्या, असे कैफियतीमध्ये नमुद करण्यात आले आहे. परंतु, तसे असल्यास प्रतिवादीने वादीविरुध्द आवश्यक ती कायदेशीर कारवाई केली होती का व नसल्यास ती का केली नाही, याचे संयुक्तिक स्पष्टीकरण अभिलेखावर प्रतिवादीतर्फे सादर करण्यात आलेले नाही.

**१६**. वादींनी मालमत्ता क्रमांक १५४ (i),(ii),(iii) यांच्या कर आकारणी नोंदवहीचे उतारे सादर केलेले आहेत. तसेच, वादींनी घर क्रमांक १५४(iii) या मिळकतीच्या खोलीवर लावलेल्या सुचनेची प्रत दाखल केलेली आहे. त्यामध्ये सदर खोली त्यांच्या परवानगीशिवाय कुलुप अथवा दार तोडुन आत गेल्यास भारतीय न्याय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात येईल, असे लिहिण्यात आल्याचे दिसून येते.

**१७**. प्रतिवादीतर्फे देखील मालमत्ता क्रमांक १५४(i),(ii),(iii) करीता कर आकारणी नोंदवहीच्या उताऱ्यांची छायांकित प्रत दाखल केली आहे. वादी क्रमांक ०१ व ०२ यांनी प्रतिवादीला त्यांच्या वकीलांमार्फत दिनांक २७/०१/२०२५ रोजी दिलेल्या नोटीसची छायांकित प्रत दाखल करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रस्तुत वादीच्या विधीज्ञांनी देवघराला लावलेले कुलुप काढुन घेवुन नियमाप्रमाणे चावी बाहेर ठेवण्यासाठी प्रतिवादीला कळविल्याचे दिसुन येते. दिनांक १८/०९/२०२३ रोजीचा तंटामुक्ती, अध्यक्ष यांच्याकडे प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जाची छायांकित प्रत

दाखल करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रतिवादीने *त्यांचा मोठा भाऊ व त्यांची पत्नी त्यांनी अपशब्दांचा वापर करुन घाबरविण्याचा प्रयत्न करतात*, असे नमुद करण्यात आले आहे. दिनांक १८/०३/२०२४ रोजीचा पोलीस निरीक्षक, लोवले, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, यांना प्रतिवादीने वादी क्रमांक ०१ व त्यांच्या पत्नीविरुध्द दाखल केलेल्या तक्रारीची छायांकित प्रत दाखल केली आहे. दिनांक १८/०३/२०२४ रोजी प्रतिवादीने वादी क्र. ०१ व त्यांच्या पत्नीला दिलेल्या नोटीसची छायांकित प्रत दाखल करण्यात आली आहे. तसेच, प्रतिवादीने घरातील खोलीचे छायाचित्रे दाखल केली आहेत.

**१८**. दोन्ही बाजुंच्या अभिकथनांवरुन, प्रतिवादीच्या हिश्यात आलेल्या रुममध्ये मुळ देवघर व देव असल्याचे दिसुन येते. त्याठिकाणी प्रतिवादीचे वास्तव्य असल्याचे सकृतदर्शनी अभिलेखावर आलेले आहे. वादी क्रमांक ०१ व त्यांची पत्नी ही प्रतिवादीला सदर रुमच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असताना लाथाबुक्क्यांनी मारहान केल्याबाबत पोलीस निरीक्षक, संगमेश्वर यांना प्रतिवादीने दिलेल्या फिर्यादमध्ये नमुद करण्यात आले आहे. परंतु, सदर फिर्यादीच्या प्रतीवरुन पोलीसांनी गुन्हा दाखल केल्याची बाब अभिलेखावर आली नाही. प्रतिवादीतर्फे दाखल पोलीस निरीक्षक, लोवले, ता. संगमेश्वर यांना दिलेल्या फिर्यादीच्या प्रतीवर संबंधीत पोलीस ठाण्याची पोहोचची स्वाक्षरी असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, पोलीसांकडे प्रतिवादीने तक्रार दाखल केली होती, ही बाब सकृतदर्शनी सिध्द झालेली नाही.

**१९**. दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या वाटपाच्या कागदपत्रावर प्रतिवादींची सही आहे व त्यांची रुम देवघर म्हणुन मान्य केल्याचे त्यात नमुद केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. अशा परीस्थीतीत, प्रतिवादीच्या रुममध्ये मुळ देवघर व देव असल्याचे दिसुन येते. वादीच्या म्हणण्याप्रमाणे, ते मुंबईवरुन गावी

आल्यावर नित्यनियमाने देवपुजा-अर्चा करीत होते व प्रतिवादी बाहेर गावी राहत असली तरीही, देवघराची चावी बाहेर ठेवुन जात असल्याने त्यांना देवाची पुजाअर्चा करता येत होती. परंतु, १६/११/२०२५ रोजी प्रतिवादीने देवघराच्या रुमच्या दरवाजाला सुचना लावलेली असल्याने वादीला देवाची पुजाअर्चा करणे शक्य झाले नाही. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे, ती माहेरी असुन आपली रुम उघडी ठेवु शकत नसल्याचे प्रतिवादीने म्हणणे मांडले आहे. सदरचे देवघर हे वाडवडीलार्जीत असल्याने त्यांची पुजाअर्चा करण्याचा वादींना पुर्णपणे अधिकार आहे. त्यामुळे, देवघरात येवुन वादींनी पुजाअर्चा करणे उचीत असुन त्यांना त्यापासून प्रतिबंध करता येणार नाहीत.

**२०.** सदरची रुम चोरीच्या भयामुळे उघडी ठेवु शकत नसल्याचे प्रतिवादीचे म्हणणे ग्राहय धरले असता, वादी, प्रतिवादी यांना सदर देवघराला एक कुलुप लावुन त्याच्या दोन चाव्या तयार करून घेवून त्या त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे ठेवल्या तर सदर रुम उघडुन ठेवण्याची गरज भासणार नाही व वादीला त्यांचेकडील चावी वापरून देवघरात येवुन पुजाअर्चा करणे शक्य होईल, असे मला वाटते.

**२१.** वादी क्र. ०१ व त्याची पत्नी प्रतिवादीला सदर रुममधुन बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे. तसा अर्ज त्यांनी दिनांक १८/०९/२०२३ रोजी तंटामुक्ती, अध्यक्ष यांच्याकडे दिल्याचा दिसुन येतो. त्यावर देखील तंटामुक्ती, अध्यक्ष यांची पोहोचची स्वाक्षरी, नाव व शिक्का दिसून येत नाही. प्रतिवादीने त्याबाबत योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे प्रतिवादीने दिलासा मागितल्याचे दिसुन येत नाही.

**२२.** अशा परीस्थीतीत, वादीने मांडलेले अभिकथन हे संक्षिप्तरीत्या फेटाळण्याजोगे नसुन ते गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी संपरीक्षेची गरज असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, वादीस सकृतदर्शनी केस आहे. अर्ज मंजुर करुन प्रतिवादीला

देवघराचे कुलुप काढुन टाकुन दरवाजाला परत कुलुप लावु नये, असा आदेश वरील विवेचनांवरुन व चोरीचे भय असल्याचे प्रतिवादीचे कथन लक्षात घेतले असता, देता येणार नाही. परंतु, वादींना देखील मुळ देवघरातील देवाची पुजाअर्चा करण्यासाठी प्रतिबंध करता येणार नाही. अशा परीस्थीतीत, वादी व प्रतिवादी यांनी सदर देवघराचे एकाच कुलुपाच्या दोन चाव्या त्यांच्याकडे तयार करुन घेवुन त्या त्यांनी वापरल्यास दोघांनाही कोणतीही अडचण येणार नाही व चोरीचे भय देखील राहणार नाही. उर्वरित वादीने मागितलेला प्रस्तुत अर्जातील दिलासा नामंजुर केल्यास वादीचे देवघरात जावुन देवाची पुजाअर्चा करणेबाबतचा हक्क व अधिकार उपभोगता येणार नाही. त्यामुळे, त्यांच्या धार्मिक भावना दुखावून त्यांचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल, असे सकृतदर्शनी दिसुन येते. त्यामुळे, न्यायाचा तौलानिक तराजु देखील अंशत: वादींच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. सबब, मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदविलेले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ०४ करीता</u> :–**

**२३.** मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ वरील निष्कर्षांमुळे, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो –

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने दावा मिळकत विषयक देवघराच्या दरवाजा व कुलुपाला लावलेली सुचना काढुन त्या दरवाजाच्या कुलुपाची चावी पुर्वीप्रमाणे दरवाजाबाहेर खिळयाला अडकवुन ठेवावी, अथवा ते कुलुप काढुन टाकावे व त्या दरवाजाला परत कुलुप लावु नये, असा मागितलेला दिलासा याद्वारे नामंजूर

करण्यात येत आहे.

**३**. प्रतिवादीने वादींना दावा मिळकत विषयक देवघरात पुजाअर्चा, श्री गणपती उत्सव, धार्मिक कार्ये व उत्सव करण्यास स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत मंजूर करण्यात येत आहे.

**४**. खर्चाबाबत वेगळा आदेश नाही.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.23 18:16:31 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २०/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 20/12/2025 |
| Order signed by PO. on | :- | 20/12/2025 |
| Order uploaded on | :- | 23/12/2025 |